# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

ग्राहक तक्रार क्र. २३७–२०१०/ दिनांक :

## केस क्र. २३७/२०१०

| | |
|---|---|
| श्री. गुरुबसू मल्लाप बिळूर,<br>रा. मुचंडी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>पक्षकार<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | विरूध्द |

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
( ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल )
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. गुरुबसू मल्लाप बिळूर, रा. मुचंडी, ता. जत, जि. सांगली यांनी ‘ अ ‘ फॉर्ममध्ये मंचाकडे दि. ५.१०.२०१० रोजी अर्ज केलेला आहे. शेतीपंप नवीन वीज कनेक्शनसाठी चलनाची रक्कम भरलेली असून एस.ओ.पी. प्रमाणे वीज कनेक्शन मिळाले नाही. वीज कनेक्शन व नुकसान भरपाई मिळावी अशी मंचाकडे मागणी केलेली आहे.तत्पूर्वी सांगली कक्षाकडे तक्रारदाराने शेतीपंप वीज कनेक्शनचे चलन मिळावे म्हणून तक्रार क्र. ९३८ दि. ३१.३.२०१० रोजी तक्रार केली होती. त्याप्रमाणे सांगली कक्षाने दि. १.४.२०१० रोजी आदेश पारीत केला.

वितरण कंपनीने आपल्या दि. २१.१०.२०१० च्या लेखी अहवालात श्री. मारुती आनंदा पाटोळे यांनी यांचा कार्यालयास अर्ज प्राप्त झाला असून त्यांनी चलनाची रक्कम दि. ५.५.२०१० रोजी भरलेली आहे. चाचणी अहवाल दि. १२.५.२०१० रोजी दिलेला आहे परंतु जागेची पाहणी केली असता विद्युत संच मांडणी केलेली नव्हती असे म्हटले आहे.

सदर तक्रारीची सुनावणी कोल्हापूर येथे दि. १०.११.२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीच्यावेळेस ग्राहक गैरहजर. वि.प.तर्फे श्री. क्षिरसागर, नोडल ऑफीसर, सांगली, श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ हजर. सुनावणीच्यावेळेस वि.प.ने जागेची प्रत्यक्ष पाहणी केली असता ग्राहकाने विद्युत संचाची मांडणी केली नसल्याचे सांगितले.

सुनावणीच्यावेळेस वि.प.तर्फे सांगण्यात आले की, ग्राहकाच्या कामाचे अंदाजपत्रक मंजूर असून त्यांचे ०.१० कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. तसेच संयुक्त तपासणी दि. १६.५.२०१० करण्यात आली त्यावेळी ग्राहकाने जागेवर मोटर व इतर साहित्य जोडलेले नसल्याचे दिसून आले. तपासणी अहवालावर शाखा अधिकारी दोरीकोणूर ( संख उप विभाग ) व लाईनमनच्या सह्या आहेत, ग्राहकाची सही नाही.

प्रथमदर्शनी अ फॉर्म हा मुदतबाह्य व अपूर्ण तपशील असल्यामुळे मंचास तक्रारदाराचा अर्ज फेटाळणे योग्य वाटते का ?

उत्तर : होय

कारणमिमांसा

१) सांगली कक्षाने दि. १.४.२०१० रोजी आदेश दिला असतांना मंचाकडे अपील ६० दिवसांत न करता दि. ५.१०.२०१० रोजी करण्यात आले. त्यामुळे अपीलास विलंब झालेला आहे.

२) ‘ अ ‘ नमुन्यातील अर्जात तक्रारदाराने चलन भरणा करणे व चाचणी अहवाल देणेबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही म्हणजे अर्जाचा तपशील पूर्ण नाही. चलन भरणा केल्याचा पुरावा जोडलेला नाही.

प्रथमदर्शनी अर्ज फेटाळण्यात येत असलातरी तक्रारदाराने वीज जोडणीसाठी नवीन टेस्ट रिपोर्ट द्यावा व वितरण कंपनीने त्यांच्या प्राधान्य क्रमाप्रमाणे वीज जोडणी द्यावी असे मंचास वाटते. ‘ अ ‘ फॉर्म अपील हे मुदतबाह्य असल्यामुळे नुकसान भरपाई देणे संयुक्तिक वाटत नाही.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मुदतबाह्य असलेने फेटाळणेत येत आहे.
२) खर्चाबाबत आदेश नाही.
३) तक्रारदाराने नवीन चाचणी अहवाल दिल्यानंतर प्राधान्य क्रमाप्रमाणे वीज जोडणी द्यावी.
४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. बी. पानकर )
सदस्य सचिव

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.